**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४१ । सोमवार २२ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# जिल्ह्यातील ५८ पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या

## तीन पोलीस निरीक्षक, २१ सपोनि तर ३४ उपनिरीक्षकांचा समावेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील तीन पोलीस निरीक्षकांसह ५८ पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत प्रशासकीय विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. २१ सहाय्यक पोलीस निरीक्षक तर ३४ उपनिरीक्षकांचा समावेश आहे

दिनांक २१ रोजी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाची बैठक पार पडली. बैठकीत जिल्हास्तरीय पोलीस आस्थापना मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव उपस्थित होते. बैठकीत नमूद पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या नेमणुका करण्याविषयी चर्चा झाली. त्याप्रमाणे बदल्यांबाबत व नेमणुकांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन जनहितार्थ, कायदा व सुव्यवस्था, प्रशासकीय निकडीनुसार व विनंतीनुसार सन २०१५ च्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ न चे पोटकलम (१) व (२) तसेच त्या खालील सुधारित स्पष्टीकरणानुसार, तसेच सक्षम प्राधिकारी म्हणुन जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाने ५८ अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय विनंती बदल्या केल्या आहेत.

नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक राजेंद्र पंढरीनाथ गुंजाळ यांची दंगल विरोधी पथकात नेमणूक करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक विजय पुंडलिकराव देशमुख यांची जिल्हा विशेष शाखेत तर जिल्हा विशेष शाखेतील पोलीस निरीक्षक संतोष नारायण भंडारे यांची पोलीस नियंत्रण कक्षात नेमणूक करण्यात आली आहे.

### एलसीबीमध्ये मोठे फेरबदल

**या बदल्यांमध्ये एलसीबीमधील तीनजणांना हटवून नव्या तिघांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे या नव्या अधिकाऱ्यांना आपल्या कामाचा ठसा उमटविण्याची चांगली संधी आहे.**

# हंडीनिमगावातील सराईत गुन्हेगाराला बेड्या

## गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसे हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव शिवारात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका सराईत गुन्हेगाराला बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसांसह एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथक नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत माहिती काढत होते. यावेळी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार श्रावण पिंपळे हा छत्रपती संभाजीनगर- अहिल्यानगर रोडवरील जिओ पेट्रोल पंपाजवळ, हांडीनिमगाव शिवारात गावठी कट्टा घेऊन फिरत आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन सापळा रचला व एका मोकळ्या मैदानात संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या श्रावण सुरेश पिंपळे (वय-२८, रा. नैताळे, ता. निफाड, जि. नाशिक) याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्या कब्जात ३० हजार रुपये किमतीचा एक गावठी कट्टा २ हजार रुपयांची दोन जिवंत काडतुसे आणि १० हजार रुपयांचा एक मोबाईल असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

अटक करण्यात आलेला आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांमध्ये तब्बल १५ गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी पोलीस अंमलदार बाळासाहेब खेडकर यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्ट ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऐंशी टक्के समाजकारण, वीस टक्के राजकारण हीच शिवसेनेची शिकवण - किरण काळे

## वर्धापन दिनी विशेष मुलांसोबत आनंदाचे क्षण; ठाकरे शिवसेनेतर्फे अनाम प्रेममध्ये मिष्टान्न भोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त ठाकरे शिवसेना, अहिल्यानगर शहराच्या वतीने अंध, अपंग आणि विशेष मुलांसाठी कार्य करणाऱ्या स्नेहालय प्रणित अनाम प्रेम या संस्थेतील मुलां समवेत मिष्टान्न भोजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी या मुलांसोबत प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळ्याचे क्षण अनुभवत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न केला. ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण मी शिवसेनेची शिकवण आहे. हा समाजसेवेचा वसा अविरतपणे जपण्याचे काम शिवसैनिक करत राहतील, असे प्रतिपादन यावेळी बोलताना महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले.

यावेळी संजय झिंजे, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, केडगाव शिवसेनेचे प्रतीक बारसे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, महिला आघाडीच्या उषा भगत, शारदा वाघमारे, मीना घाटगे, शैला लांडे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, सचिन नवघिरे, बाळासाहेब जरे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, स्वप्निल साठे, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, विनोद शिरसाट, बाबासाहेब वैरागर, जयराम ■ पान ४ वर

# जायकवाडी परिसरात युवकाचा खून

## पोलिसांचा तपास सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जायकवाडी कमिटी हॉलजवळ एका युवकाचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

मृत युवकाची ओळख प्रभू सुरडकर (रा. संजयनगर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी पटली आहे. खून नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे.

घटनास्थळी वरिष्ठ पोलिस अधिकारी दाखल झाले असून पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स भारत मोरे करीत आहेत.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून अधिक माहिती घेण्याचे काम सुरू आहे. अधिकृत तपासानंतरच खुनामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# उद्योगांना आवश्यक परवानग्या व मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून द्या - जिल्हाधिकारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यात औद्योगिक विकासाला अधिक गती देण्यासाठी उद्योगांना विविध विभागांकडून आवश्यक असलेल्या परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर प्रशासकीय मंजुरी विहित कालावधीत उपलब्ध करून द्याव्यात. तसेच उद्योगांना वीज, पाणी, रस्ते यासह सर्व मूलभूत सुविधा विनाविलंब उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उद्योगविषयक आढावा बैठकीत डॉ. पंकज आशिया बोलत होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक विकास हा जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा आधार असून उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. नवीन उद्योगांना प्रोत्साहन देतानाच विद्यमान उद्योगांच्या अडचणी दूर करणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागांनी उद्योगस्नेही दृष्टीकोन ठेवून कार्य करावे आणि प्रलंबित विषयांवर कालबद्ध कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

उद्योगवाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यावर भर देत विविध विभागांनी उद्योगांच्या प्रस्तावांबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी. उद्योगांना आवश्यक मंजुरी व परवानग्या वेळेत मिळाल्यास नवीन गुंतवणुकीला चालना मिळेल आणि रोजगारनिर्मिती वाढण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

औद्योगिक वसाहतींमधील पायाभूत सुविधांचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा पाईपलाईन, ■ पान ४ वर

# सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार रस्ते गरजेचे - आ. काशिनाथ दाते सर

## मुंगशीत ७४ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील मुंगशी गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध रस्ते विकासकामांचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यक्षम आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते झाले. यामध्ये मुंगशी ते शिंदे वस्ती सिमेंट काँक्रीट रस्ता - १८ लाख, करपे वस्ती ते विसापूर रोड सिमेंट काँक्रीट रस्ता - २० लाख, करपे वस्ती ते थोरात वस्ती सिमेंट काँक्रीट रस्ता - १८ लाख तसेच मुंगशी गाव ते करपे वस्ती रोडपासून मच्छिंद्र थोरात वस्ती ते मधला मळा व बाराभाई मळा खडीकरण व मुरुमीकरण अशा एकूण ७४ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार दाते सर म्हणाले, ''ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी दर्जेदार रस्ते ही मूलभूत गरज आहे. चांगल्या रस्त्यांमुळे शेतीमालाची वाहतूक, विद्यार्थ्यांचे शिक्षण, नागरिकांचे दैनंदिन जीवन आणि गावाचा आर्थिक विकास यांना मोठी चालना मिळते. मुंगशी गावाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देत भविष्यातही विकासकामांची गती कायम ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील.''

या प्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमराव कळमकर, माजी सभापती गणेश शेळके, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अध्यक्ष सुनील थोरात, बोरुडे सर, दिनेशराव बाबर, अमोल मैडम, तुषार पवार, कल्याण थोरात, ■ पान ४ वर

# रामायणातील पाचवे सुंदर कांड हे मानवतेला संस्कार, श्रद्धा आणि जीवनमूल्यांची प्रेरणा देणारे – स्वामी अद्वैतानंद सरस्वती

## रामायण कधीच जुने होत नाही; चार वेद आणि सनातन संस्कृतीच भारताच्या वैभवाचा पाया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


(छाया : विजय मते)

**अहिल्यानगर–** श्रीराम हे केवळ एका युगाचे नायक नसून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहेत. रामायण ही केवळ कथा नसून ती भारतीय संस्कृतीचे जीवन,तत्त्वज्ञान आहे. रामकथा कधीही जुनी होत नाही, कारण प्रत्येक पिढीला ती नवे संस्कार, नवी प्रेरणा आणि जीवन जगण्याची दिशा देत असते. चार वेद, उपनिषदे आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा आपल्या समाजाला आजही टिकवून ठेवत आहे, असे प्रतिपादन व्यासपीठ चालक स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी केले.

चिन्मय मिशनच्या वतीने आयोजित तुळशी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योतीताई गाडे, चिन्मय मिशनचे अध्यक्ष ॲड. डी.डी.घोरपडे, उपाध्यक्ष विद्याताई हारदे, कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे, सचिव देवराम मोरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी चिन्मय मिशनचे कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे यांनी प्रास्ताविक करताना सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. चिन्मय मिशनच्या माध्यमातून समाजामध्ये धर्म, संस्कार, अध्यात्म आणि राष्ट्रभक्तीची मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मिशनच्या कार्याचा विस्तार, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचलेला प्रभाव आणि ज्ञानयज्ञामागील पार्श्वभूमी त्यांनी उपस्थितांसमोर उलगडून सांगितली.

मार्गदर्शन करताना स्वामी प्रत्ययानंद सरस्वती म्हणाले की, अशी कोणतीही जागा नाही जिथे प्रभू श्रीरामांचे अस्तित्व नाही. संपूर्ण जगभरात रामायणाचा प्रभाव आणि महिमा पसरलेला आहे. भारताच्या सीमा ओलांडून अनेक देशांमध्ये रामायणाचा अभ्यास केला जातो. रामकथा ही मानवाला

## दै. आकर्षण निवडक

### योग, निसर्गोपचार,उपवास व निसर्ग आहार या विषयावर व्याख्यान

अहिल्यानगर - १२ व्या जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्या धामणे योग, निसर्गोपचार उपवास, निसर्ग आहार व एक योगाद्वारे आपल्या शारीरिक आणि मानसिक रोगापासून मुक्ती या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे अशी माहिती योग विद्याधाम चे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली. हे व्याख्यान मंगळवार दिनांक २३.६.२०३६ रोजी दुपारी ४ वाजता योग विद्या धाम कुष्ठधाम रोड, ज्ञानेश्वर मोटर ड्रायव्हिंग च्या मागे, सावेडी येथे होणार आहे. हे व्याख्यान संत हिरा हिरदासराम योग आणि प्राकृतिक चिकित्सा संस्थान भोपाळचे संस्थापक डॉक्टर रमेश टेवानी हे देणार आहेत. डॉ. रमेश तेवानी हे ५० वर्षांपूर्वी अनेक आजारांनी त्रस्त होते . आणि त्यांनी निसर्गोपचार वगळता इतर कोणत्याही वैद्यकीय पद्धतीचा आधार न घेता फक्त निसर्गोपचारावर ते सर्व आजारातून पूर्ण बरे झाले. त्यांनी बंगळूर येथील आरजीयूएचएस () मधून बीएनवायएस (निसर्गोपचार आणि योगिक विज्ञान) हा साडेपाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आणि बद्धकोष्ठतेमध्ये पीएचडी केली आहे. त्यांनी गेल्या ५० वर्षांपासून एकही औषध घेतलेले नाही आणि मानद तत्त्वावर पीडित मानवतेची सेवा करत आहेत. त्यांनी भारत, लंडन, कॅनडा, दुबई आणि नेपाळ यांसारख्या अनेक शहरांमध्ये आणि जगभरात आरोग्य जनजागृती कार्यक्रम केलेले आहेत.

### शमीम उमर बागवान यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



अहिल्यानगर - शहरातील कालू बागवान गल्ली, धरती चौक येथील शमीम उमर बागवान (वय वर्षे ८०) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर हसन शाह कादरी कब्रस्तानमध्ये दफन विधी करण्यात आला. याप्रसंगी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होत्या. त्यांच्यामागे तीन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने नातेवाईक व परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते समीर बागवान, इमरान व शकूर बागवान यांच्या त्या आई होत्या.

### निमगाव वाघा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

अहिल्यानगर - नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे केंद्र सरकारच्या मेरा युवा भारत, नवनाथ विद्यालय, श्री नवनाथ युवा मंडळ आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या योग शिबिरात शालेय विद्यार्थी, युवक-युवती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत योगाबाबत जनजागृतीचा संदेश दिला. तर योगातून निरोगी जीवनाचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संकल्प केला. यावेळी उद्योजक तथा योग शिक्षक बाळासाहेब शहाणे, डॉ. सुनिल गंधे आणि जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बबन बनकर यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. योगामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल घडून येतात, असे सांगत त्यांनी योगाचे महत्त्व विशद केले.योग शिबिरादरम्यान ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, सूर्यनमस्कार यांसारख्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत प्रत्येक आसनाची माहिती जाणून घेतली. तसेच प्राणायाम आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून मनः शांती, तणावमुक्त जीवन आणि उत्तम आरोग्य कसे प्राप्त करता येते, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना सकस व संतुलित आहाराचे महत्त्वही पटवून देण्यात आले. बदलत्या जीवनशैलीत आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, योगाभ्यास आणि पौष्टिक आहार यांचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे म्हणाले की, ‘‘योग आणि प्राणायाम हे निरोगी जीवनाचे आधारस्तंभ आहेत.

## आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनशैलीसाठी समर्पित

### निरंकारी मिशनचा योग दिन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सद्‌गुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रामित जी यांच्या आशीर्वादाने, संत निरंकारी मिशनच्या वतीने देशभरातील १५००हून अधिक शाखांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग आणि आध्यात्मिक जागृतीवर लक्ष केंद्रित करणारे कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केले.

या विषयी अधिक माहिती देताना, मिशनचे अहिल्यानगर विभागीय प्रभारी हरीश खुबचंदानी यांनी सांगितले की, येथील संत निरंकारी मिशनच्या शाखेत योग विद्याधाम चे ज्येष्ठ योगशिक्षक बबनराव बारगळ व गणेश येनगंदुल सर यांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यास करण्यात आला,तसेच झोन ३६ मधील अनेक शाखां मध्ये सुद्धा योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात भक्त, सेवादल स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी सक्रियपणे सहभाग घेतला. अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित योग सत्रात, सहभागींनी योगाभ्यास केला आणि निरोगी व संतुलित जीवनशैली अंगीकारण्याची शपथ घेतली.

सद्‌गुरू माता जी अनेकदा आपल्या विचारांमध्ये ‘‘निरोगी मन, सुलभ जीवन‘‘ असा उल्लेख करतात आणि स्पष्ट करतात की आपले शरीर हे निरंकार देवाकडून मिळालेली देणगी आहे आणि ते निरोगी ठेवणे हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे. म्हणूनच, दीर्घायुष्य आणि सक्रिय व यशस्वी जीवनासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. निरंकारी मिशनने आयोजित केलेली ही जनकल्याण मोहीम सर्वांगीण कल्याणाचा संदेश देतानाच, निः संशयपणे समाजाला आरोग्य, जागरूकता आणि सकारात्मक जीवन मूल्यांकडे प्रेरित करते.

## आर्य चाणक्यमध्ये १२३३ विद्यार्थ्यांच्या उपस्थित योगदिन साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्रा.विद्यामंदिर, पैठण येथील १२३३ विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय योगदिनी योग व प्रणयमाचे धडे घेतले.

‘‘ओंकारं बिंदुसंयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिनः।कामदं मोक्षदं चैव ओंकाराय नमो नमः।।‘‘ या श्लोकाच्या अर्थ असा की बिंदुसहित असलेल्या ओंकाराचे योगीजन नित्य ध्यान करतात. सर्व कामना आणि मोक्ष प्रदान करणाऱ्या त्या ओंकाराला माझा वारंवार नमस्कार असो.अशा श्लोकाचा अर्थडोळ्यासमोर ठेवत त्रिवार ओंकार घेत योग दिनास प्रारंभ करत बाराव्या आंतरराष्ट्रीय योगदिन पैठण येथील आर्य चाणक्य



प्रा.विद्यामंदिर मधील इयत्ता पहिली ते सातवी मधीलविद्यार्थ्यांनी विशेष सहभाग नोंदविला. क्रीडा शिक्षक सतिश आहेर प्राणायमाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शनाप्रमाणे विद्यार्थ्यांनी करून दाखविले.

याप्रसंगी लहान इयत्तांच्या अनुषंगाने पूरक हालचाली करत उभे राहून करावयाची ताडासन ,वृक्षासन, त्रिकोनासन, हस्तपादासन नंतर बसून करावयाचे पद्मासन आसने नंतर सूर्यनमस्कार आणि प्राणायाम सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार असणाऱ्या सूर्यनमस्कारांची माहिती देण्यात आली त्या नंतर कपालभाती ,अनुलोम विलोम ,भस्त्रीका हे प्राणायाम करून ध्यान इत्यादी नंतर विविध योग – प्राणायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक करून योगाचे महत्त्व सांगण्यात आले. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सतिश आहेर यांनी केले.

## जलसंधारण चळवळ ग्रामविकासासाठी आवश्यक- आ. दाते

### आम्ही टाकळीकरच्या जलसंधारण कामाची पाहणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पाण्याचे नियोजन करणारे गावच भविष्यात प्रगती साधणार आहेत. यासाठी प्रत्येक गावात जलसंधारण चळवळ वाढीस लागणे आवश्यक आहे. शासकीय यंत्रणेसोबत सामाजिक संस्था यात सहभागी व्हायला हव्यात. त्यामुळेच आम्ही टाकळीकरचा जलसंधारण कामातील पुढाकार प्रशसनीय आहे, असे प्रतिपादन आमदार काशीनाथ दाते यांनी केले.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशन, ग्रामपंचायत व विविध संस्थांच्या माध्यमातून सुरू केलेल्या निवडुंगेवाडी तलाव खोलीकरण जलसंधारण कामास आ. दाते यांनी आज भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ज्येष्ठ पत्रकार चाँद शेख यांनी जलसंधारण कामाची माहिती दिली. एक महिन्यापासून हे काम सुरू असून पावसाळा सुरू होईपर्यंत हे काम सुरू राहणार आहे. तसेच पुढील वर्षीही तलाव खोलीकरण उर्वरित काम पूर्ण केले जाणार आहे. आ. दाते म्हणाले, जागतिक हवामानातील बदलामुळे पाण्याची समस्या दिवसेदिवस बिकट होत चालली आहे. त्यामुळे राज्य शासन जलसंधारण कामांना प्राधान्य देत आहे. गावच्या विकासाचे व्हिजन ठेवताना पाण्याचे व्हिजन असणे आवश्यक आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, भगवंत थोपटे गुरुजी, सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन बबनराव पायमोडे, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ . भाऊसाहेब खिलारी, आम्ही टाकळीकरचे स्थानिक समन्वयक संतोष सोनावळे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, गंगाधर निवडुंगे, अक्षय गोरडे, बापू रांधवण, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, आबा धुमाळ, संपत धुमाळ, अंकुश धुमाळ, संकेत थोपटे, महादू झावरे, दीपक ढूस , नितीन धुमाळ.महेश धुमाळ, पोपट धुमाळ, रविंद्र पायमोडे, जालिंदर बांडे, प्रवीण थोपटे, विष्णू निवडुंगे, पवन निवडुंगे, राहुल धुमाळ, सतीश निवडुंगे शहाजी पायमोडे, निलेश चव्हाण,गणेश चव्हाण, विविध संस्थांचे पदाधिकारी, धुमाळ वस्ती व निवडुंगेवाडी येथील युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहकार भारतीच्या जिल्हाध्यक्षपदी हजारे, महामंत्रीपदी ॲड. देवकर व संघटन प्रमुखपदी खामकर यांची नियुक्ती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यातील सहकार चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सहकार भारतीच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी अजिनाथ हजारे तर महामंत्रीपदी लेखापरीक्षक ॲड. उमेश देवकर तसेच संघटन प्रमुखपदी सुरेश खामकर यांची नियुक्ती करण्यात आल्या आहेत. सहकार भारतीचे विभाग प्रमुख संतोष गायकवाड यांनी अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्याची नूतन कार्यकारीणीची घोषणा केली. यावेळी महिला प्रमुखपदी आशा मिस्कीन, सचिव किशोर जेजुरकर, प्रसिद्धीप्रमुख वैभव जोशी, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष भानुदास रासकर आदींच्याही नावांची घोषणा करण्यात आली. सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांच्या हस्ते सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष अजिनाथ हजारे म्हणाले, सहकार चळवळीला बळकटी आणण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील आहेत. राज्यात नवे सहकार धोरण आणून राज्यतील सहकार चळवळ ही भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक होण्यासाठी सहकार भारती योगदान देत आहे. राज्यात सर्वात जास्त सहकारी संस्था नगर जिल्ह्यात आहेत. त्यामुळे सहकार भारतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन जिल्हाध्यक्ष पदाच्या माध्यमातून मी कार्यक्षेत्रातील सहकार चळवळीच्या उत्कृष्ट कार्यासाठी काम करणार आहे.

## युवा सेनेच्या वतीने मूकबधिर विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन वाटप

### । शिवसेनेच्या वर्धापनदिनाचा सामाजिक उपक्रम
### । दिव्यांग विद्यार्थ्यांना आधार देत पक्षाचा आनंदोत्सव साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन शहरात विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने युवा सेनेच्या वतीने सावेडी येथील भिस्तबाग परिसरातील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण वाटत हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबुशेठ टायरवाले, शहरप्रमुख संभाजी कदम, माजी नगरसेवक सचिन जाधव, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, नवनाथ कातोरे, संजय शेंडगे, श्याम नळकांडे, सचिन शिंदे, विक्रम राठोड, काका शेळके, संदीप दातरंगे, अभिजीत अष्टेकर, रमेश खेडकर, ओंकार शिंदे, विशाल शितोळे, मयूर गायकवाड, शंकर शेळके, घनश्याम घोलप यांच्यासह शिवसेना महिला आघाडीच्या ॲड. स्वाती जाधव, नलिनी गायकवाड, सलोनी शिंदे, तृप्ती साळवे, निता बर्वे, आनंदराव शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांनी शिवसेनेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. ते म्हणाले की, शिवसेनेची भूमिका नेहमीच वंचित, उपेक्षित आणि दुर्लक्षित घटकांना न्याय व आधार देण्याची राहिली आहे. दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचा अविभाज्य घटक असून त्यांच्याकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर सन्मानाने पाहिले गेले पाहिजे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा सामाजिक कार्याच्या माध्यमातून पुढे नेण्याचे काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेच्या माध्यमातून सातत्याने करत आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना मदतीबरोबरच प्रेम, आपुलकी आणि आत्मविश्वासाची गरज असते. त्यामुळे अशा उपक्रमांद्वारे त्यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## नृत्यासाज भरतनाट्यम् अकॅडमीचा १०० टक्के निकाल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई एप्रिल २०२६ सत्राच्या भरतनाट्यम् परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत भिंगार येथील नृत्यासाज भरतनाट्यम् अकॅडमीच्या विद्यार्थीनींनी घवघवीत यश संपादन करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

अकॅडमीच्या प्रारंभिक ते मध्यमा पूर्ण या स्तरांवरील परीक्षांसाठी एकूण ४८ विद्यार्थीनी परीक्षेला बसल्या होत्या. त्यापैकी २९ विद्यार्थीनींनी विशेष योग्यतेसह यश संपादन केले आहे.

प्रारंभिक परीक्षेत नक्षत्रा शेलार,प्राप्ती बारगजे,अरुषि कनोजीया, प्रांजल गायकवाड, अर्षिती गायकवाड,स्पृहा पवार, स्वरा कडते,अराध्या ठोके, श्रावणी साबळे या विशेष योग्यतेसह तर दिंगबरी कोंड्रा, अनिका वाघमोरे, स्वामीनी लोखंडे, ओवी सोनमाळी, देशना भंडारी, स्वरा गुंड या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.

प्रवेशिका प्रथम परीक्षेत अन्वी घोरपडे, स्वानंदी सातकर,माही नाबरीया,संचिता बरबडे,किआना दवे,राधा बेरड,शिवाण्या शेरकर, अनुष्का सातपुते, स्वराली बरबडे, आरूषि सिंग, श्रद्धा गोहेर, शताक्षी कांबळे, शांभवी सोनसळे, क्षितीजा बनसोडे, तृप्ती नामदे, आद्या गायकवाड, अद्वीका आमटे, अरित्रिका गायकवाड, रितीका वाघ,शिवाण्या पठारे यांनी विशेष योग्यतेसह यश संपादन केले आहे.

प्रवेशिका पूर्ण परिक्षेत आराध्या बनिया, प्राची गोहेर, जानवी बरार, क्षितीजा सांगळे, श्रेया परदेशी, सिमंतीनी कमलोरी यांनी प्रथम श्रेणीत यश मिळविले.

मध्यमा पूर्ण परिक्षेत पुजा चव्हाण, हर्षिता परदेशी, सेजल बहिरम, राधिका परदेशी, अपूर्वा दळवी, जान्हवी अहिर, प्रज्ञा कुमार यांनी प्रथम श्रेणीतसह यश संपादन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थीनींना नृत्यासाज भरतनाट्यम् अकॅडमीच्या संचालिका कु. आश्लेषा पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थीनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक व परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## भेसळखोरांवर लगाम घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचा पुढाकार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन विभागाने टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागीय आयुक्त तुकाराम मुंडे यांनी ही माहिती देत नागरिकांना भेसळीविरोधातील मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास अथवा भेसळीची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रार करताना संबंधित आस्थापनाचे नाव, अचूक पत्ता, उत्पादनाची माहिती आणि उपलब्ध पुरावे सादर करावेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांना तक्रार नोंदविण्यासाठी १८००२२२३६५ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून –. या ई–मेलवरही तक्रार पाठविता येणार आहे.

भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे संशयास्पद अन्नपदार्थांची माहिती प्रशासनाला देऊन भेसळखोरांविरोधातील कारवाईला हातभार लावावा, असे आवाहन तुकाराम मुंडे यांनी केले आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळे अन्न सुरक्षा अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## जय आनंद महावीर युवक मंडळाच्या शाकाहारी टिफीन स्पर्धेत प्राची थिगळे प्रथम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रत्येक महिलेमध्ये पाककलेचे गुण असतात. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सकस, ताजे आणि पौष्टिक अन्न देण्यासाठी त्या स्वयंपाक घरात अतिशय आपुलकीने स्वयंपाक करतात. सध्याच्या जंक फूडच्या काळात मुलांना शुद्ध शाकाहारी पौष्टिक टिफीन देताना महिला कल्पकता दाखवतात. त्यामुळे मुलं घरचा टिफीन आनंदाने खातात. सुगरण महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाने आयोजित केलेल्या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. महिलांना चांगल्या रेसिपींची माहिती झाली. अशा स्पर्धांतून महिलांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होते, असे प्रतिपादन सिमा राहुल मुनोत यांनी केले.



नवी पेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने महिलांसाठी पौष्टिक शाकाहारी टिफीन स्पर्धा नुकतीच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राची अमोल थिगळे (ज्वारीचे पौष्टिक धिरडे) यांना मिळाला. द्वितीय क्रमांक उषा नितीन शेठिया (मोरींगा स्क्वेअर्स), तृतीय क्रमांक शिल्पा पियुष मुथ्था (कडधान्याचे स्प्राऊड अप्पे) तर उत्तेजनार्थ पारितोषिक शैला सुरेश सोनसळे (बाजरीच्या पुऱ्या), वर्षा विशाल गुंदेचा (नाचणी व ज्वारीचं नूडल्स), सोनल तरटे (नाचणीचे लाडू), कोमल पवार (ज्वारीचे घावण) यांना मिळाले. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सिमा मुनोत, स्पर्धेच्या परीक्षक राणी शरद मुथा, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, प्रमोद गांधी (पीटू) आदी उपस्थित होते.

शैलेश मुनोत म्हणाले की, नगरच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेले जय आनंद महावीर युवक मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### फादर्स डे निमित्त संडे चर्च ग्रुपच्या वतीने वडिलांचा सन्मान



अहिल्यानगर- फादर्स डेच्या निमित्ताने अहिल्यानगर येथील संडे चर्च ग्रुपच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित वडिलांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला तसेच त्यांना फादर्स डेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमादरम्यान बायबलमधील वडिलांच्या प्रेम, त्याग आणि जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या वचनांचे वाचन करण्यात आले. ''जसा बाप आपल्या मुलांवर दया करतो, तशी परमेश्वर त्याचे भय बाळगणाऱ्यांवर दया करतो,'' तसेच ''ज्याला ज्ञानी पुत्र झाला आहे, त्याला त्याच्यापासून आनंद होईल या वचनांच्या माध्यमातून कुटुंबातील वडिलांचे अनन्यसाधारण स्थान स्पष्ट करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी वडील हे कुटुंबाचा खंबीर आधारस्तंभ असून त्यांच्या त्याग, कष्ट आणि प्रेमामुळेच कुटुंब सुरक्षित व समृद्ध बनते, अशी भावना व्यक्त केली. तसेच सर्व वडिलांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून भिंगारमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

अहिल्यानगर - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगींग पार्क परिसर योगमय वातावरणाने दुमदुमून गेला. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या योग दिन विशेष कार्यक्रमात ग्रुपच्या सदस्यांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध योगासने, प्राणायाम आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. विशेष म्हणजे महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती. योगाबरोबरच स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. मागील अनेक वर्षांपासून योग आणि पर्यावरण संवर्धनाची चळवळ सातत्याने राबविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने नागरिकांना निरोगी आणि सुदृढ जीवनासाठी नियमित योग करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात योगप्रशिक्षक प्रकाश देवळालीकर, विकास भिंगारदिवे, लविशा माखिजा, विनोद मुथा आणि हेमंत गोयल यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. प्रत्येक आसनाचा शरीरावर होणारा सकारात्मक परिणाम, त्याचे आरोग्यदायी फायदे तसेच नियमित योगाभ्यासाचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. योगसत्रादरम्यान उपस्थित सदस्य आणि नागरिकांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा करत निरोगी आरोग्यासाठी वर्षभर नियमित व्यायाम आणि योग करण्याचा निर्धार व्यक्त केला. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक तणाव कमी होतो आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, याची प्रचिती अनेकांनी यावेळी व्यक्त केली.

### ज्येष्ठ शिक्षक मारुती खंडू रोकडे गुरुजी यांचे निधन

अहिल्यानगर - सिव्हिल हडको, भारत चौक



परिसरातील रहिवासी तसेच शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व कै. मारुती खंडू रोकडे गुरुजी यांचे शुक्रवार, दि. १९ जून २०२६ रोजी पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. निधनसमयी यांचे वय ८३ होते. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.मारुती रोकडे गुरुजी यांनी शिक्षक म्हणून अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. आपल्या शांत, संयमी व कर्तव्यनिष्ठ स्वभावामुळे त्यांनी विद्यार्थी, पालक आणि सहकारी शिक्षकांमध्ये विशेष आदराचे स्थान निर्माण केले होते. सन २००२ मध्ये ते सेवेतून निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग कायम ठेवला होता.विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन तसेच भजनी मंडळातील सहभाग यामध्ये त्यांना विशेष रस होता.

# पारनेर-कुर्ला एसटी सेवा पूर्ववत

**खा. नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश । प्रवाशांकडून कृतज्ञतेची भावना व्यक्त**

**कोरोनानंतर बंद झालेली बससेवा पुन्हा सुरू; ग्रामीण भागातील मुंबईकरांना मोठा दिलासा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर- कोरोना काळापासून बंद असलेली पारनेर ते कुर्ला-नेहरूनगर ही महत्त्वाची एसटी बससेवा पुन्हा सुरू करण्यात आली असून, खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे खा. लंके यांनी केलेल्या मागणीची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ही सेवा पूर्ववत सुरू केली आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यासह मार्गावरील अनेक गावांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

मुंबईत नोकरी, व्यवसाय व विविध कारणांनी स्थायिक झालेल्या हजारो नागरिकांसाठी ही बससेवा जीवनवाहिनी मानली जात होती. मात्र कोरोना काळात ही सेवा बंद करण्यात आल्यानंतर नागरिकांना गावाकडे ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकांना कल्याण किंवा पुणे येथे उतरून पुढील प्रवासासाठी अन्य वाहतुकीचा आधार घ्यावा लागत होता.

### गावागावांतील नागरिकांची गैरसोय

पारनेर डेपो अंतर्गत चालणारी ही बस पारनेर, लोणी हवेली, जामगाव, भाळवणी, माळकूप, हिवरे कोरडा, गोरेगाव, कान्हूर पठार, पिंपळगाव रोठा, नांदूर पठार, आणे, बेल्हे, राजुरी, आळेफाटा, ओतूर, मढ, पारगाव, माळशेज, मुरबाड, कल्याण मार्गे कुर्ला-नेहरूनगरपर्यंत धावत होती. या मार्गावरील अनेक गावांतील नागरिक मुंबईत वास्तव्यास असल्याने त्यांच्यासाठी ही सेवा अत्यंत सोयीची ठरत होती. बससेवा बंद झाल्यानंतर नागरिकांनी विविध स्तरांवर मागणी केली होती. ही मागणी लक्षात घेऊन खासदार नीलेश लंके यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना सविस्तर पत्र पाठवून सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती.

### खा. लंके यांच्या पत्राची दखल

परिवहन मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात खा. लंके यांनी या बससेवेचे महत्त्व अधोरेखित करत मार्गावरील नागरिकांची होणारी गैरसोय निदर्शनास आणून दिली होती. मुंबईत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना गावाकडे येण्यासाठी थेट वाहतूक सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले होते. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देऊन सेवा पूर्ववत सुरू करण्याची विनंतीही केली होती.

### प्रवाशांकडून आनंद

एसटी सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर पारनेर तालुक्यासह मार्गावरील गावांतील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. विशेषतः मुंबईत राहणाऱ्या कुटुंबांना आता थेट प्रवासाची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ व खर्चाची बचत होणार आहे. अनेक प्रवाशांनी खासदार नीलेश लंके यांनी नागरिकांच्या प्रश्नाची दखल घेत प्रभावी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

### ग्रामीण भागाला मुंबईशी जोडणारा दुवा

पारनेर ते कुर्ला-नेहरूनगर ही बस सेवा केवळ प्रवासाचे साधन नसून ग्रामीण भाग आणि मुंबई यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानली जाते. सेवा पुन्हा सुरू झाल्यामुळे तालुक्यातील विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

## सकल राजस्थानी युवा मंच (ट्रस्ट) च्या नवीन कार्यकारिणीची निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** सकल राजस्थानी युवा मंचच्या कोअर कमिटीची बैठक नुकतीच उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत सन २०२६-२७ या कार्यकाळासाठी अध्यक्षपदी श्री. संदेश मुनोत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. श्री. धनेश कोठारी यांनी त्यांचे नाव सुचविले, तर श्री. नीरजजी काबरा यांनी त्यास अनुमोदन दिले.

नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. संदेश मुनोत यांनी आपल्या कार्यकारिणीची घोषणा करताना सचिवपदी श्री. धनेश खत्ती, उपाध्यक्षपदी श्री. सचिन भंडारी व श्री. पवन झंवर, खजिनदारपदी श्री. संदीप ओस्तवाल, सह-खजिनदारपदी श्री. नवरत्न डागा तसेच सह-सचिवपदी श्री. विकास सुराणा यांची निवड जाहीर केली.

यावेळी मंचाच्या पहिल्या प्रकल्पासाठी प्रकल्प अध्यक्ष ( ) म्हणून श्री. राजेश गुगळे यांची निवड करण्यात आली.

मंचाचा पहिला उपक्रम म्हणून हरिद्वार येथील पतंजली वेलनेस सेंटरच्या सहकार्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, हे शिबिर दिनांक २६ जून २०२६ रोजी बडी साजन मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या आरोग्य शिबिरासाठी नोंदणी करण्यासाठी इच्छुकांनी ९८६००२४५०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

बैठकीचा समारोप सर्व सदस्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि आगामी उपक्रमांच्या नियोजनासह आनंददायी वातावरणात झाला.

## काटेवाडीत बडे यांच्याकडून शालेय साहित्य वाटप



(छाया : सतिष जगताप)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –** काटेवाडी येथे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले पाथर्डी तालुक्यातील काटेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सामाजिक बांधिलकीतून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. गंगाबाबा पेट्रोलियमचे मॅनेजर अभिमान बडे यांनी आपल्या मूळ गावी या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करून माणुसकीचे दर्शन घडवले.मुख्याध्यापकांकडून सन्मानकार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक भीमराव पांखरे यांनी अभिमान बडे यांच्या या कौतुकास्पद कार्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान केला. गावातील मुलांच्या शिक्षणाला मदत करण्यासाठी बडे यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सर्वांनी कौतुक केले.ग्रामस्थांची मोठी उपस्थितीया सामाजिक उपक्रमाच्या वेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद घुले रामनाथ ढाकणे, संदिप घुले, राजेंद्र ढाकणे (पोलिसउपनिरिक्षक ), अंबादास घुले, अजिनाथ ढाकणे, गोरक्षनाथ ढाकणे, संतोष घुले, केशव ढाकणे आदी काटेवाडी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता उपस्थितांचे आभार शिक्षक खेडकर यांनी मानले.

## परिक्रमा पॉलीटेक्निक महाविद्यालय तर्फे श्रीगोंदा,दौंड आणि शिरूर तालुक्यातील विविध शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा –** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील मा.श्री.बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा पॉलिटेक्निक तर्फे चालू वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या इयत्ता १० वी.परीक्षेमध्ये श्रीगोंदा,दौंड आणि शिरूर या तालुक्यातील विविध शाळेतील प्रत्यक्ष माध्यमिक शाळेत जाऊन जे गुणवंत विद्यार्थी उत्कृष्ट गुणाने पास झाले त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा व संबंधित प्राचार्य आणि शिक्षक यांचा गौरव करण्यात आला.

गौरव करण्यात आलेले माध्यमिक शाळा व गुणवंत विद्यार्थी .... दौंड स्कूल प्रथम क्रमांक – निरू निनाद वाघजकर – ९५%द्वितीय क्रमांक – अनुष्का अर्जुन टेकावड – ९२.४०%तृतीय क्रमांक – कृष्णा महादेव लगड – ९०.८०%श्री गुप्तेश्वर माध्यमिक विद्यालय, मोरेवस्ती प्रथम क्रमांक – सुरज लक्ष्मण शिंदे – ९०.००%द्वितीय क्रमांक – विवेक मनोज मोहिते – ८९.००%तृतीय क्रमांक – ओंकार विजय भिसे – ८०.००%सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, देऊळगाव राजे प्रथम क्रमांक – लावर सानिका दत्तात्रय – ८९.४०%द्वितीय क्रमांक – भोसले दिशा बाबासाहेब – ८८.६०%तृतीय क्रमांक – खराडे मोहिनी सदानंद – ८७.६०%न्यू इंग्लिश स्कूल, जलालपूर प्रथम क्रमांक – खैरे साईराज पंडित – ९१.२०%द्वितीय क्रमांक – कासारे शिवाजी बाळासाहेब – ९०.००%तृतीय क्रमांक – गावडे प्रतीक्षा लालासाहेब – ८९.४०%फिरंगाई माध्यमिक विद्यालय, कुरकुंभ प्रथम क्रमांक सार्थक विजय यादव – ९४.४०%द्वितीय क्रमांक समृद्धी देविदास साळुंके ९३.२०%तृतीय क्रमांक उदय ताताजी जाधव – ९२.४०%श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, सोनवडी प्रथम क्रमांक – कल्पना संजय राठोड – ७७.८०%द्वितीय क्रमांक – गणेश रवी चव्हाण – ७७.००%तृतीय क्रमांक – सिद्धी निलेश लोखंडे – ७६.८०%न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव प्रथम क्रमांक – विशाल तुकाराम गोडसे – ९४.८०%द्वितीय क्रमांक – उवेज अमजद तांबोळी – ९३.६०%तृतीय क्रमांक – कृष्णा संजय मांडे – ९३.००%श्री वळणेश्वर विद्यालय, अजनूज प्रथम क्रमांक – योगेश गिरमकर– ८९.८०%द्वितीय क्रमांक – श्रेयश यादव – ८८.६०%तृतीय क्रमांक – तनिष्का गिरमकर – ८८.००%महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा प्रथम क्रमांक – धोंडे निशांत नवनाथ – ९४.४०%द्वितीय क्रमांक – डेबरे आदित्य सुनील – ९३%तृतीय क्रमांक – चव्हाण अभिजीत बाळू – ९२.८०%खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, येळपणे प्रथम क्रमांक कळमकर प्रसाद सोन्याबापू – ९६%द्वितीय क्रमांक पठारे वैष्णवी रोहिदास – ९३.२०%तृतीय क्रमांक धावडे तन्वी संतोष – ९३%कौठा माध्यमिक विद्यालय, कौठा.

## केंद्र स्तर विशेष शिक्षक सेलची स्थापना

**दिव्यांग विद्यार्थ्यांसह केंद्र स्तरावरील विशेष शिक्षकांचे सोडविले जाणार प्रश्न**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, केंद्र स्तरावरील विशेष शिक्षकांचे प्रश्न आणि पालकांच्या विविध समस्यांना वाचा फोडण्यासाठी केंद्र स्तर विशेष शिक्षक सेल या नवीन सेलची अधिकृत स्थापना करण्यात आली आहे. केंद्रस्तर विशेष शिक्षक सेल पूर्णपणे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि त्यांच्याशी संबंधित घटकांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असणार आहे.

या सेल चे संपूर्ण कामकाज शिक्षक आमदार किशोर (भाऊ) दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणार आहे. केंद्र स्तर विशेष शिक्षकांच्या आणि दिव्यांगांच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व पाठीशी असल्याने या सेनेच्या माध्यमातून अनेक प्रलंबित मागण्या मार्गी लागतील, असा विश्वास संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये या संघटनेचा विस्तार करण्यासाठी व कामाला गती देण्यासाठी केंद्र स्तर विशेष शिक्षक सेलच्या जिल्हाध्यक्षपदी उमेश शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित कार्यक्रमात आमदार किशोर दराडे यांनी उमेश शिंदे यांच्या निवडीबद्दल सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप शिक्षक सेलचे अध्यक्ष वैभव सांगळे, रामेश्वर ढगे यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

विशेष शिक्षक सेल'ची प्रमुख उद्दिष्टे दिव्यांग मुलांना मुख्य प्रवाहातील दर्जेदार शिक्षण मिळवून देणे आणि त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे राहणार आहे. केंद्र स्तरावर कार्यरत असणाऱ्या विशेष शिक्षकांच्या समस्या , नोकरीविषयक अडचणी आणि इतर हक्कांच्या लढ्यासाठी हे सेल प्रमुख व्यासपीठ म्हणून काम करेल. तसेच दिव्यांग पाल्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन करणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून केले जाणार आहे. शिंदे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गड-किल्ले संवर्धनातून छत्रपतींच्या विचारांचा जागर

**'आपला मावळा'च्या मोहिमेला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद । वढू-तुळापूर येथे स्वच्छता, वृक्षारोपण, इतिहास संवर्धन आणि शिवव्याख्यानांचा संगम; खासदार नीलेश लंके यांचे मावळ्यांना प्रेरणादायी आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिरूर –** छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांचा जागर करत इतिहास, संस्कृती आणि स्वराज्याच्या वारशाचे जतन करण्याचा संदेश देणारी भव्य गड-किल्ले स्वच्छता व संवर्धन मोहीम शिरूर तालुक्यातील ऐतिहासिक वढू आणि तुळापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून कार्यरत असलेल्या 'आपला मावळा' संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातील शिवप्रेमी, इतिहासप्रेमी युवक-युवती आणि मावळ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

छत्रपतींच्या कार्याचा आणि बलिदानाचा इतिहास जपण्यासाठी गड-किल्ल्यांचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला. वढू-तुळापूर ही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतींशी निगडित पवित्र भूमी असल्याने या ठिकाणी आयोजित उपक्रमाला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. मोहिमेदरम्यान गड-किल्ल्यांच्या परिसरातील कचरा संकलन करून स्वच्छता करण्यात आली. परिसरातील झाडाझुडपे हटविणे, ऐतिहासिक वास्तूंच्या परिसराची निगा राखणे, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करणे तसेच जुन्या वृक्षांच्या खोडांना रंगकाम करून त्यांचे संरक्षण करण्याचे काम करण्यात आले. अनेक युवकांनी स्वखर्चाने आणि स्वयंस्फूर्तीने या कामात सहभाग घेत इतिहास संवर्धनाची सामाजिक जबाबदारी पार पाडली.

तुळापूर येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात विविध प्रकारच्या स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली. भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थित तरुण-तरुणींनी पर्यावरण संरक्षण आणि इतिहास संवर्धन यांची सांगड घालण्याची गरज अधोरेखित केली.

या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आयोजित करण्यात आलेली शिवव्याख्याने. इतिहास अभ्यासक आणि वक्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, त्यांच्या प्रशासनातील लोककल्याणकारी दृष्टीकोन, तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे अद्वितीय शौर्य आणि बलिदान याविषयी मार्गदर्शन केले. व्याख्यानांमधून युवकांना राष्ट्रभक्ती, स्वाभिमान, सामाजिक बांधिलकी आणि इतिहास जतन करण्याची प्रेरणा मिळाली.

सोलापूर, धाराशिव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, बीड, नाशिक आणि राज्यातील इतर अनेक भागांतून आलेल्या मावळ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सकाळपासूनच वढू-तुळापूर परिसरात शिवभक्तांची मोठी गर्दी झाली होती. भगवे ध्वज, छत्रपतींच्या जयघोषांनी



संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर सर्व सहभागी मावळ्यांनी इतिहास संवर्धनाची शपथ घेत स्वच्छता आणि संवर्धन मोहिमेत सहभाग घेतला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या युवकांसाठी आणि मावळ्यांसाठी दुपारच्या भोजनाची व्यवस्था शिरूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी केली होती.

यावेळी मार्गदर्शन करताना खासदार निलेश लंके यांनी गड-किल्ले संवर्धनाच्या कार्याला सामाजिक चळवळीचे स्वरूप देण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले, जोपर्यंत माझ्या श्वासात श्वास आहे, तोपर्यंत कोणतेही राजकारण न करता गड-किल्ले स्वच्छता आणि संवर्धन मोहीम सुरूच राहील. छत्रपतींचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक मावळ्याने या उपक्रमात सहभागी व्हावे. गड-किल्ल्यांचे जतन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

ते पुढे म्हणाले, गड-किल्ले हे केवळ दगड-मातीच्या रचना नाहीत, तर स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचे साक्षीदार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेला स्वाभिमान, न्याय आणि राष्ट्रनिष्ठेचा मार्ग दाखविला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही धर्म आणि राष्ट्रासाठी बलिदान दिले. त्यांच्या विचारांची मशाल पुढील पिढीकडे सुपूर्द करण्यासाठी अशा मोहिमांची आवश्यकता आहे. या उपक्रमामुळे इतिहास संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण झाली असून युवकांमध्ये गड-किल्ल्यांप्रती आत्मीयता आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली आहे. सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि इतिहास जतन यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या मोहिमेचे विविध स्तरांतून कौतुक होत असून भविष्यात अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मोलाचे योगदान - ॲड. किशोरजी देशपांडे

### श्री समर्थ विद्यामंदिरात दहावी-बारावीच्या गुणवंतांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे चेअरमन मा. ॲड. किशोरजी देशपांडे होते.

कार्यक्रमाची सुरुवात समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक व्यक्त करत प्रशालेच्या उज्ज्वल निकालाची माहिती दिली. यावर्षी प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून बारावीचा निकाल ९८ टक्के लागला आहे. दहावीच्या परीक्षेसाठी २३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १२२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणीत यश संपादन करून प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला.

यावेळी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा. दीपक ओहोळ, सेक्रेटरी व प्राथमिक विभागाचे चेअरमन मा. सुरेश क्षीरसागर, कार्यकारिणी सदस्य सौ. संध्या कुलकर्णी, श्री सुनील जोशी, सांगळे गल्ली माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे तसेच पर्यवेक्षक एल. एम. कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच गणित प्राविण्य, एन.एम.एम.एस., सी. व्ही. रामन आदी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. सर्व गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा भेटवस्तू व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थिनी अनन्या कदम व सई जोशी यांनी मनोगत व्यक्त करून प्रशालेतील शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पालक प्रतिनिधी म्हणून राणी दळवी यांनीही विद्यार्थ्यांच्या यशामागील शिक्षकांचे योगदान अधोरेखित केले.

अध्यक्षीय मनोगतात मा. ॲड. किशोरजी देशपांडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शिक्षकांच्या समर्पित कार्याचा गौरव केला. "विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचा मोठा सहभाग असतो. दहावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. प्रशालेत होत असलेला हा सत्कार विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणारा असून त्यांच्या भविष्यातील उच्च शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल," असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. बोठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. शिल्पा कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षांचा परिचय सौ. कोळंबे यांनी करून दिला. शिक्षक सत्कार वाचन सौ. शास्त्री यांनी तर गुणवंत विद्यार्थ्यांची नावे श्री. राशीनकर यांनी सादर केली.

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा; 'आरंभ योगा'तर्फे निरोगी जीवनाचा संदेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगविशारद गणेश कुलथे यांच्या 'आरंभ योगा'च्या वतीने राजस्वा स्पोर्ट क्लब, धर्माधिकारी मळा, अहिल्यानगर येथे विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगाभ्यासात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या शिबिरात 'आरंभ योगा'चे संस्थापक योगविशारद गणेश कुलथे यांनी उपस्थितांना विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम आणि ध्यान यांचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक महत्त्व त्यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले.

यावेळी बोलताना कुलथे म्हणाले, "योग म्हणजे मन, शरीर आणि आत्मा यांचा समतोल साधण्याचा प्रभावी मार्ग आहे. आधुनिक धकाधकीच्या जीवनात वाढता ताण, मानसिक अस्थिरता, चुकीची जीवनशैली आणि विविध आजारांवर मात करण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त ठरतो. निरोगी आणि आनंदी जीवनासाठी प्रत्येकाने योग आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवला पाहिजे. शरीरातील लवचिकता वाढविणारे तसेच मानसिक शांतता देणारे विविध योगाभ्यास करण्यात आले. सहभागी नागरिकांनी उत्साहाने सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

'योग, मन, शरीर, आत्मा' हा संदेश देत कुलथे यांनी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. योगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, मन स्थिर राहते आणि अनेक जीवनशैलीजन्य आजारांपासून संरक्षण मिळते, असे त्यांनी सांगितले.

आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, स्थूलता, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्या वाढत असल्याचे सांगून त्यांनी नियमित योगाभ्यास व प्राणायामामुळे रक्ताभिसरण सुधारते, श्वसनक्रिया सक्षम होते, मानसिक ताण कमी होतो आणि एकाग्रता वाढते, असे नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले. "दररोज काही मिनिटे योगासाठी द्या; आयुष्यभर निरोगी राहण्याची ऊर्जा मिळवा," असा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### योनेक्स सनराईज प्रेझेंट्स जी एच रायसोनी मेमोरियल

# जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ

### विधी सैनी आणि राजवीर कुक्कडवाल तिहेरी विजेतेपदाचे मानकरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन ने चांगल्या पद्धतीने निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले आहे.गतवर्षी देखील शालेय क्रीडा स्पर्धा व राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन खेळाडूंसाठी करण्यात आले होते. विविध स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडूंसाठी जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन ने व्यासपीठ खुले केले आहे.बॅडमिंटन खेळामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात आता चांगले परिणाम दिसू लागलेले आहेत. अहिल्यानगर मध्ये विविध अकॅडमीच्या मार्फत बॅडमिंटन खेळाडू तयार होत आहेत. अहिल्यानगर येथील बॅडमिंटनचा सिंथेटिक हॉल उपलब्ध असल्याने खेळाडूंनी सराव करून उत्तम यश संपादन करावे.बॅडमिंटन हा खेळ खेळत असताना राज्यस्तरीय व राष्ट्रीय प्रमाणपत्रे मिळविणे हा हेतू न ठेवता खेळाडूंनी बॅडमिंटन खेळ हा छंद म्हणून जोपासला जावा. राष्ट्रीय प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अनेक खेळाडू हा खेळ सोडून जातात.त्यामुळे महाराष्ट्राला व देशाला आंतरराष्ट्रीय खेळाडू मिळत नाहीत.बॅडमिंटन हा खेळ छंद म्हणून जोपासल्यास आपले आरोग्य सुदृढ व निरोगी राहिलच त्यासोबतच बॅडमिंटन खेळाला खेळाडू मिळतील.असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले आहे.

वाडियापार्क क्रीडा संकुल येथे बॅडमिंटन हॉलमध्ये अहमदनगर डिस्टिक्ट बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने योनेक्स सनराईज प्रेझेंट्स जी एच रायसोनी मेमोरियल अहिल्यानगर जिल्हा अजिंक्यपद व जिल्हा निवड चाचणी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी पुणे रायसोनी कॉलेजचे प्राचार्य एच आर कुलकर्णी, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे,अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी, खजिनदार राहुल मोटे,सदस्य डॉ.भूषण अनुभुले,चेतन बोगावत,राज्य क्रीडा प्रशिक्षक विशाल गर्जे,मुख्य पंच ऋषिकेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

रायसोनी ग्रुपचे प्राचार्य एच आर कुलकर्णी म्हणाले, रायसोनी फाउंडेशन सातत्याने क्रीडा संस्कृतीला उस्फूर्तपणे सहकार्य करीत आहे. जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन ने घेतलेल्या निवड चाचणी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना राज्यस्तरीय पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर चुणूक दाखविण्यासाठी चांगली संधी मिळाली आहे.या स्पर्धेतील खेळाडूंचे भवितव्य उज्वल आहे.या स्पर्धेतील सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करतो.

मिलिंद कुलकर्णी म्हणाले,अ.नगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन च्या वतीने खेळाडूंसाठी नेहमीच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. नवोदित खेळाडू तयार व्हावे. तसेच खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश ठेवून असोसिएशनचे कार्य सुरू आहे. या स्पर्धेला खेळाडूंनी मोठा प्रतिसाद दिला आहे.तसेच या स्पर्धेसाठी रायसोनी मेमोरियल फाउंडेशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांचे विशेष सहकार्य मिळत असते.

स्पर्धेतील विजेते खेळाडू

१९ वर्षाखालील* मुली दुहेरी विजेते-अनन्या सोले व भूमी डागा,उपविजेते-राशी सोनीमंडलेचा व यशवी चंगेडे,मुले दुहेरी विजेते-नील पितळे व राजवीर कुक्कडवाल,उपविजेते-निहार दळे व रामचरण गोंगडा,एकेरी मुली विजेते -विधी सैनी,भूमी डागा,एकेरी मुले विजेते -राजवीर कुक्कडवाल, उपविजेते-नील पितळे

१७ वर्षांखालील दुहेरी मुली-विजेते भूमी डागा व साची आगरवाल,उपविजेते समृद्धी साबळे व सायली माने,दुहेरी मुले-आयान बैस व विराज गाडेकर, उपविजेते-मिथिलेश पवार व ऋषिकेश राणा,एकेरी मुली,विजेते-विधी सैनी,उपविजेते-अनन्या सोले,मुले एकेरी विजेते-विराज गाडेकर,उपविजेते-आयन बैस

१५ वर्षाखालील एकेरी मुली विजेते-विधी सैनी, उपविजेते-सायली माने,एकेरी मुले-विजेते विराज गाडेकर, उपविजेते-ऋषिकेश राणा,

१३ वर्षाखालील एकेरी मुली विजेते-श्रावणी वीरकर, उपविजेते-गार्गी देवळालीकर, एकेरी मुले-विजेते-शर्विल काळे, उपविजेते-स्वरूप मांडे,

११ वर्षाखालील एकेरी मुली विजेते-विधी ठोंबरे, उपविजेते-सानवी आगरकर,एकेरी मुले-विजेते-स्वरूप मांडे, उपविजेते-केयूर मांडे,

खुला गट महिला दुहेरी* विजेते-सायली माने व श्रद्धा मलिक,उपविजेते-सिद्धी शर्मा-यशवी चेंगेडे,

पुरुष दुहेरी विजेते-अभिषेक बोराटे व राजवीर कुक्कडवाल,उपविजेते किरण वर्पे व जितेंद्र बिस्त.

महिला एकेरी विजेते-भव्या रसाळ,उपविजेते-श्रुती थोरात,पुरुष एकेरी विजेते*-नील पितळे,उपविजेते-राजवीर कुक्कडवाल

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून आदिती चौगुले (पुणे),दर्शन बावणे (बुलढाणा),अनुराधा माथेसुळ (अहिल्यानगर)तसेच प्रमुख पंच म्हणून ऋषिकेश कुलकर्णी (अहिल्यानगर) यांनी काम पाहिले.

# अहिल्यानगर सब-ज्युनिअर मुलींचा संघ जाहीर

### पालघर येथे होणाऱ्या राज्य आंतरजिल्हा स्पर्धेत होणार सहभागी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** महाराष्ट्र राज्य फुटबॉल असोसिएशन () आयोजित महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा सब-ज्युनिअर मुलींची फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ ची घोषणा करण्यात आली आहे. ही स्पर्धा दि. २० ते २५ जून २०२६ या कालावधीत पालघर येथे होत असून, या स्पर्धे साठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (अहिल्यानगर) तर्फे अहिल्यानगर जिल्हा संघाची घोषणा करण्यात आली आहे.

संघात प्रांजल काकडे (कर्णधार), सिद्धी पोटे, काव्या पेटकर, रुहिका सैंदाणे, स्पृहा वैद्य, जानवी देठे, कियाना गांधी, आराध्या खंडेलवाल, जस्मित खुराना, सिद्धी कुरुंद, सायशा कर्डीले, लेहेर भंडारी, समृद्धी झिने, अवनी वाघमारे, महती बहुरुपी, आर्या शिरसाठ, रिद्धी चेमटे आणि तनुजा गुंजाळ या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक प्रसाद पाटोळे तर संघ व्यवस्थापक अश्विनी पाटोळे हे जबाबदारी सांभाळणार आहेत.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांचे अभिनंदन करून राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, अमरजीत सिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपाल सिंग परमार, सहखजिनदार रणबीर सिंग परमार तसेच कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे यांनी देखील संघाला राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन करुन जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या राज्यस्तरीय स्पर्धेपूर्वी संघाच्या सराव शिबिरासाठी मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल गुलमोहर फुटबॉल क्लबचे प्रमुख जोएब खान आणि प्रशिक्षक सुभाष कानोजिया यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनतर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या सहकार्यामुळे संघाची तयारी अधिक प्रभावीपणे पार पडल्याची भावना असोसिएशनने व्यक्त केली.

# माऊंटन मॅन राजाराम आनंदराव भापकर गुरुजी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** शाहू, फुले, आंबेडकर, साठे, कलाम सामाजिक विचार मंचाच्या वतीने "माऊंटन मॅन" म्हणून ओळख असलेले राजाराम आनंदराव भापकर गुरुजी यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. भापकर गुरुजी यांनी स्वतःच्या जिद्द, कष्ट आणि चिकाटीच्या बळावर डोंगर फोडून रस्ता तयार करण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या अद्वितीय कार्यामुळे अनेक नागरिकांची ये-जा सुलभ झाली असून समाजासमोर त्यांनी संघर्ष, परिश्रम आणि लोकहिताचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. याच कार्याची दखल घेत शाहू, फुले, आंबेडकर, साठे, कलाम सामाजिक विचार मंचाचे पदाधिकारी प्रत्यक्ष त्यांच्या कार्यस्थळी आणि त्यांनी डोंगर फोडून तयार केलेल्या मार्गाच्या ठिकाणी पोहोचले. त्या ठिकाणीच सन्मान चिन्ह (ट्रॉफी), सन्मानपत्र ,शाल व पुष्पगुच्छ देऊन भापकर गुरुजी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची प्रत्यक्ष पाहणी करून उपस्थितांनी त्यांच्या जिद्दीचे आणि समाजाप्रती असलेल्या समर्पणाचे कौतुक केले. या सन्मान सोहळ्याला मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, महाराष्ट्र अध्यक्ष गणेश ढोबळे, महाराष्ट्र कार्याध्यक्ष सुनील सकट, उद्योजक सुदाम ढेमरे, युनूस पठाण, प्रदीप ससाणे, मुस्ताक पठाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख उपस्थिती म्हणून जय हिंद माजी सैनिक बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मेजर नीलकंठ उल्हारे, मेजर मारुती ताकपेरे व राम भालसिंग (आनुलोम) उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र महिला अध्यक्षा उषाताई शिंदे, वंदना सकट, आरती सकट, वैष्णवी शिंदे आणि सार्थक शिंदे यांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, डोंगर फोडून लोकांसाठी मार्ग निर्माण करणे हे केवळ काम नसून समाजसेवेचे एक महान उदाहरण आहे. राजाराम आनंदराव भापकर गुरुजी यांची जिद्द, मेहनत आणि लोकहिताची भावना अनेकांना प्रेरणा देणारी असून त्यांचा हा सन्मान संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. कोथुळ खंडोबा देवस्थानचे पुजारी गुरव व ट्रस्टच्या वतीने सर्व उपस्थित पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला आणि उपस्थितांनी भापकर गुरुजींना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

(पान १ वरून)

## वीस टक्के राजकारण हीच शिवसेनेची शिकवण - किरण काळे

आखाडे, धनंजय देशमुख आदींसह शिवसैनिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना काळे म्हणाले, हिंदुरुदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसैनिकांना केवळ राजकारण नव्हे, तर समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचे संस्कार दिले आहेत. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून या विशेष मुलांसोबत काही क्षण घालवण्याची संधी मिळाली, हे आमच्यासाठी समाधान देणारे आहे. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य, हीच आमच्या वर्धापन दिनाची खरी भेट आहे. यावेळी मुलांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. उपस्थित शिवसैनिकांनी मुलांशी संवाद साधत त्यांच्यासोबत आपुलकीचे क्षण व्यतीत केले. सामाजिक बांधिलकी जपत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत प्रेम आणि माणुसकीचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न शिवसेनेकडून सातत्याने केला जाईल, अशी भावना यावेळी काळे यांनी व्यक्त आली. कार्यक्रमास शिवसैनिकांसह संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## उद्योगांना आवश्यक परवानग्या व मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून द्या - जिल्हाधिकारी

सांडपाणी व्यवस्थापन, वीज वितरण व्यवस्था तसेच इतर आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एमआयडीसी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्दे शही त्यांनी यावेळी दिले.बैठकीत उद्योजकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व निवेदनांवर सात दिवसांमध्ये कार्यवाही करून त्यांचे निराकरण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## विकासासाठी दर्जेदार रस्ते गरजेचे - आ. काशिनाथ दाते सर

अनिल दिवटे, प्रतीक दुधाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस भास्कर थोरात, संतोष शिवाजी करपे, विलास थोरात पाटील, चेअरमन बाळासाहेब दगाबाज, श्याम करपे सर, विलास थोरात मेजर, सुदाम दगाबाज, मारुती शिंदे, सुहास थोरात, निलेश थोरात, राहुल शिंदे, भाऊसाहेब शिंदे, फक्कड थोरात, मच्छिंद्र थोरात, विठ्ठल थोरात, योगेश थोरात, काशिनाथ शिंदे, संतोष थोरात, पांडुरंग पवार, कचरू गायकवाड, बबन दगाबाज, कैलास वाळुंज, सौ. निर्मला सुनील थोरात, कांचन थोरात, छाया थोरात, वैशाली शिंदे, सुमन थोरात, अक्षय थोरात, अजय थोरात, श्रीकांत साळवे, रमेश दगाबाज, भाऊसाहेब दगाबाज, वैभव थोरात, नामदेव पवार, नामदेव दगाबाज, राजू थोरात, मयूर थोरात, शिवाजी शेळके, मारुती शेळके, सुभाष वाळुंज, नवनाथ थोरात, संजय थोरात, रमेश थोरात, बबन करपे, आबा करपे, दत्ता पवार, सौ. सुमन दगाबाज, मंजुळा पठारे, कल्पना दगाबाज, वैशाली दगाबाज, अर्जुन थोरात, वसंतराव थोरात, कोडिभाऊ करपे, वायरमन दिलीप थोरात, कल्पेश थोरात यांच्यासह गावातील महिला वर्ग, ग्रामस्थ व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंगशी गावातील विविध वस्त्या आणि शेतरस्त्यांना जोडणारी ही कामे पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांच्या वाहतुकीच्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थित ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केली.

"मुंगशी गावातील ७४ लाख रुपयांच्या रस्ते विकासकामांचे भूमिपूजन हे गावाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांनी ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विकासाची गती कायम ठेवली आहे. चांगले रस्ते म्हणजे गावाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा मजबूत पाया असून, या कामांमुळे नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार आहे. विकासाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ ठरविण्याचे कार्य आ. दाते सर सातत्याने करत आहेत." सुनील थोरात (तालुकाध्यक्ष, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, पारनेर)

## रामायणातील पाचवे सुंदर कांड हे मानवतेला संस्कार, श्रद्धा आणि जीवनमूल्यांची प्रेरणा देणारे - स्वामी अद्वैतानंद सरस्वती

सदाचार, संयम, कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देणारी आहे. त्यामुळेच रामायणाला जागतिक स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ते पुढे म्हणाले की, रामायणातील पाचवे कांड म्हणजे सुंदरकांड. हे कांड भक्ती, श्रद्धा, समर्पण आणि पराक्रमाचे मूर्त स्वरूप आहे. प्रभू श्रीरामांच्या कार्यासाठी हनुमंतांनी केलेले अतुलनीय योगदान या कांडात वर्णन केले आहे. अयोध्येपासून लंकेपर्यंतचा प्रवास हा केवळ भौगोलिक नसून आत्मिक आणि आध्यात्मिक प्रवास आहे. रामांचे एकवचनी, एकवाणी आणि एकपत्नी चरित्र आजच्या काळातही प्रत्येकासाठी आदर्श ठरते. स्वामी अद्वैतानंद सरस्वती म्हणाले की, प्रभू श्रीरामांचे व्यक्तिमत्त्व फुलाप्रमाणे सुगंधित आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग मानवाला काही ना काही शिकवण देतो. रामायण ही आपल्या दुःखाचे निवारण करणारी कथा आहे. बुद्धिमान आणि विचारशील व्यक्तींना या ग्रंथात जीवनाचे गूढ आणि तत्त्वज्ञान सापडते. मनातील व्यथा, चिंता आणि अस्थिरता दूर करण्याची ताकद रामकथेमध्ये आहे.

सुंदरकांडाच्या महिम्याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, या कांडातील प्रत्येक श्लोक सुंदर आहे. भगवान सुंदर आहेत, भक्त सुंदर आहे, भक्ती सुंदर आहे आणि ध्यानही सुंदर आहे. विठ्ठलाच्या विटेवरील भक्तीपासून ते रामभक्त हनुमंतांच्या समर्पणापर्यंत सर्वत्र सौंदर्याचे दर्शन घडते. म्हणूनच भारतीय संस्कृतीने 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' ही संकल्पना स्वीकारली आहे. बाह्य सौंदर्य क्षणिक असते, परंतु अंतःकरणातील सौंदर्य आणि संस्कार चिरंतन असतात, असेही त्यांनी नमूद केले. धर्म आणि संस्कृतीच्या संदर्भात बोलताना स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी सांगितले की, आपल्या धर्माचे मूळ आधारस्तंभ चार वेद आहेत. वेद, उपनिषदे आणि रामायण-महाभारतासारखे ग्रंथ भारतीय संस्कृतीला आजही जिवंत ठेवत आहेत. ही परंपरा केवळ कर्मकांडापुरती मर्यादित नसून मानवाला सत्य, कर्तव्य, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा देणारी आहे. या ग्रंथांचे अध्ययन आणि आचरण ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री.घोरपडे म्हणाले की, चिन्मय मिशनचे कार्य केवळ आध्यात्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही. राष्ट्र उभारणी, समाजसेवा, संस्कार संवर्धन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीही मिशन प्रभावीपणे कार्यरत आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अशा ज्ञानयज्ञांची आवश्यकता असून त्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले